Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A+' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२५/430

दिनांक : ३०.०४.२०२५

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक/परीक्षा केंद्र प्रमुख,**
**सर्व संबधित महाविद्यालय/परिसंस्था/परीक्षा केंद्र,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर.**

विषय : प्रस्तुत विद्यापीठाच्या पदवी अंतिम व पदव्युत्तर प्रथम व द्वितीय वर्षाच्या दि. ०२.०५.२०२५ व ०३.०५.२०२५ रोजी व दि. ०६.०५.२०२५ रोजीची वाणिज्य पदवी अंतिम वर्ष अभ्यासक्रमांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात येत असुन पुढे ढकलण्यात येणाऱ्या परीक्षा ज्या-त्या अभ्यासक्रमांच्या शेवटच्या दिवशी आयोजित करण्यातबाबत.

संदर्भ : प्रस्तुत विद्यापीठामार्फत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी प्रसिध्द करण्यात आलेले वेळापत्रक

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मार्च/एप्रिल, २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा अनुक्रमे दि. ०८.०४.२०२५ व २९.०४.२०२५ रोजी पासून सुरु झालेल्या आहेत.

आयुक्त तथा सक्षम प्राधिकरी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्फत आयोजित विधी ३ वर्षाच्या उमेदवारांना सामावून घेण्यासाठी, विधी ३ वर्षाच्या सीईटी २०२५ परीक्षा दि. ०२.०५.२०२५ आणि ०३.०५.२०२५ रोजी घेण्यात येणार आहे. तसेच Chartered Accountant (CA) लेखा परिक्षक पदाची परीक्षा दि. ०६.०५.२०२५ रोजी घेण्यात येणार असल्यामुळे सदर दिवशी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलणे आवश्यक आहे.

**त्यानुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या पदवी अंतिम व पदव्युत्तर प्रथम व द्वितीय वर्षाच्या दि. ०२.०५.२०२५ व ०३.०५.२०२५ रोजी व दि. ०६.०५.२०२५ रोजीची वाणिज्य पदवी अंतिम वर्ष अभ्यासक्रमांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात येत असुन पुढे ढकलण्यात येणाऱ्या परीक्षा ज्या-त्या अभ्यासक्रमांच्या शेवटच्या दिवशी आयोजित करण्यात येतील व त्याबाबत स्वतंत्ररित्या पत्राव्दारे कळविण्यात येईल.**

करिता, उपरोक्त प्रमाणे सर्व संबधित प्राचार्य/संचालक, परीक्षा केंद्र प्रमुख, महाविद्यालय/परिसंस्था, परीक्षार्थी व पालक यांनी नोंद घ्यावी. ही विनंती.

I/c **संचालक**
**परीक्षा व मुल्यामापन मंडळ**

यापत्राची प्रत:
१. जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन सुचित करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन कार्यवाही करण्यात यावी.
२. संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन सुचित करण्यात येते की, सदर पत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
३. नोडल ऑफिसर, एम.के.सी.एल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन सुचित करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन कार्यवाही करण्यात यावी.
४. कक्ष प्रमुख, सर्व संबधित कक्ष, परीक्षा व मूल्यमापन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन सुचित करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन कार्यवाही करण्यात यावी.